महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

**महत्वाचे/अतितात्काळ/ईमेलद्वारे**

क्रमांक: संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/ 521

दिनांक: 15 APR 2026

प्रति,
अधिष्ठाता/ प्राचार्य,
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये.

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (एस.ई.बी.सी.), इतर मागास वर्ग (ओ.बी.सी.), अनुसुचित जाती (एस.सी.), विमुक्त जाती (व्ही.जे.), भटक्या जमाती (एन.टी.) व विशेष मागासवर्ग (एस.बी.सी.) प्रवर्गातील प्रवेश, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २६ ऑगस्ट २०२५ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुद्धीपत्रक दिनांक ०५ सप्टेंबर २०२५ नुसार अंमलबजावणी करुन संचालनालय स्तरावर पडताळणी अहवाल सादर करणेबाबत...**

संदर्भ: १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२५/प्र.क्र.६७/आरक्षण-५, दिनांक २६/०८/२०२५
२. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.:- सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक, दिनांक ०५ सप्टेंबर, २०२५.

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासकमांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (एस.ई.बी.सी.), इतर मागास वर्ग (ओ.बी.सी.), अनुसुचित जाती (एस.सी.), विमुक्त जाती (व्ही.जे.), भटक्या जमाती (एन.टी.) व विशेष मागासवर्ग (एस.बी.सी.) प्रवर्गातील प्रवेशित उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

सद्यस्थितीत उक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेशांची संचालनालय स्तरावर पडताळणी सुरु आहे. त्याअनुषंगाने सदरील प्रमाणपत्रांची पडताळणी करुन त्याचा संगणक प्रणालीच्या माध्यमातुन वस्तूनिष्ठ अहवाल प्राधिकरणास मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (एस.ई.बी.सी.), इतर मागास वर्ग (ओ.बी.सी.), अनुसुचित जाती (एस.सी.), विमुक्त जाती (व्ही.जे.), भटक्या जमाती (एन.टी.) व विशेष मागासवर्ग (एस.बी.सी.) प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे महाविद्यालयाकडे सादर केलेली आहेत परंतू, सदर विद्यार्थ्यांनी/महाविद्यालयांनी Online Portal वर Upload केलेली नाहीत, त्यामुळे सदरील प्रवेशांची मान्यता प्रलंबित ठेवण्यात आली आहे, अशा विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे संबंधीत विद्यार्थ्यांनी/महाविद्यालयांनी तात्काळ Online Portal वर Upload करावीत. तसेच, याप्रकरणी योग्य ती कार्यवाही पुढील १० दिवसात पुर्ण करावी.

याशिवाय ज्या सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (एस.ई.बी.सी.), इतर मागास वर्ग (ओ.बी.सी.), अनुसुचित जाती (एस.सी.), विमुक्त जाती (व्ही.जे.), भटक्या जमाती (एन.टी.) व विशेष मागासवर्ग (एस.बी.सी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे अद्यापी प्राप्त झालेली नाहीत अशा विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय/प्रवर्गनिहाय यादी प्राधिकरणांस cvc2024.ara@gmail.com या ईमेल वर सादर करावी.

सोबत - वरीलप्रमाणे

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
सदस्य सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

प्रत माहितीकरीता अग्रेषित,
१. मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित, -
१. महासंचालक, कृषी शिक्षण संचालनालय, पुणे.
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
३. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
४. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई
५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
६. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई

प्रत माहितीकरीता अग्रेषित, -
१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.
२. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक
३. आयटी सेल, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी - उक्त प्रमाणे मागास संवर्गाच्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे Upload करता यावीत या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.
४. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.